| Publication: Punyanagari | Page No: 04 |
| --- | --- |
| Edition: Mumbai | Date: 15-07-2024 |

पुण्यनगरी


### आयुर्विम्याच्या माध्यमातून संपदा व्यवस्थापन

# आर्थिक समृद्धीचे मार्ग खुले करण्याची गुरूकिल्ली

मालमत्ता कर, वारसा आणि मध्यम ते उच्च पतधारक व्यक्तींमधील आयकर यासंदर्भातील चिंतांवर आयुर्विमा हा वैविध्यपूर्ण पर्याय म्हणून उदयाला येत आहे. याचे प्राथमिक उद्दिष्ट वाढीची जोपासना व संपत्तीचे कार्यक्षम व्यवस्थापन हे आहे. त्याचबरोबर व्यवसाय मालकांना मालमत्तेचे हस्तांतर सुरळीत करून देणारे वारसा नियोजनाचे साधन म्हणूनही आयुर्विमा उत्तम पर्याय आहे. आपल्या जवळच्या व्यक्तींना आर्थिक सुरक्षितता पुरवण्याच्या पारंपरिक कामापलीकडे आयुर्विमा संपदा व्यवस्थापनाचे एकात्मिक गतिशील साधन म्हणून उत्क्रांत झाले आहे.

संपदा निर्माण करण्याचे व सुरक्षित राखण्याचे बहुआयामी साधन आयुर्विमा हे संपदा निर्मितीचे व जतनाचे प्रभावी साधन आहे. काही पॉलिसींमध्ये रोखता मूल्य घटक असतो, तर काही पॉलिसी या भविष्यकाळासाठी गुंतवणूक करण्याचा मार्ग असतात. उदाहरणार्थ, होल लाइफ पॉलिसी हे गुंतवणुकीचे साधन असून, त्याद्वारे काळाच्या ओघात संपत्ती जमा केली जाते. यामुळे पॉलिसीधारकांना इच्छित सुरक्षितता मिळू शकते तसेच वाढीशी निगडित लवचिकतेसह गुंतवणुकीची संधीही मिळू शकते.

आर्थिक सुरक्षिततेच्या पलीकडे जात, आयुर्विमा, निव्वळ एका उत्पादनाहून अधिक काही साध्य करतो. संपदा व्यवस्थापनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे गतिशील साधन म्हणून आयुर्विमा उत्क्रांत झाला आहे. संपत्ती जतन करण्याचे कार्यक्षम मार्ग आयुर्विम्याच्या माध्यमातून उपलब्ध होतात. लाभार्थींना संपत्ती हस्तांतरित करण्याचे कार्यक्षम मार्ग पुरवून मालमत्तेच्या नियोजनामध्ये आयुर्विमा महत्त्वाची भूमिका बजावतो. निवृत्तीनंतर उत्पन्नाचा पर्यायी स्त्रोत म्हणूनही आयुर्विमा उपयुक्त ठरतो: याचा अर्थ निवृत्तीवेतनधारकांना काम थांबवल्यानंतरच्या आयुष्यात पैशाचा अतिरिक्त स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो.

वाढते वैद्यकीय खर्च व त्यांचा वाढता भार बघता, आयुर्विमा आकस्मिक वैद्यकीय गरजांसाठी समर्पित निधी ठरू शकतो. त्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीवर ताण न येता वैद्यकीय खर्च भागवले जाऊ शकतात. विशेषतः व्यक्ती आणि कुटुंबांना अशा अवाढव्य खर्चाच्या परिस्थितींना तोंड द्यावे लागते तेव्हा दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांशी तडजोड न करता आव्हानात्मक परिस्थितींतून मार्ग काढता येऊ शकतो.

थकीत कर्ज चुकवण्यासारख्या कामांसाठी तत्काळ रोख पैसा मिळणे आवश्यक असल्याच्या परिस्थितीत किंवा आपत्कालीन खर्च भागवताना आयुर्विमा पॉलिसीतील डेथ बेनिफिट सुविधा तत्काळ निधींचे स्त्रोत देऊ करते. या रोखतेच्या सुविधेमुळे आर्थिक लवचिकता वाढते आणि लाभार्थींना मालमत्ता विकण्यासारख्या कोणत्याही आर्थिक ताणाशिवाय या आकस्मिक परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य होते.

**कर कार्यक्षमतेसह संपत्तीचे अनुकूलन**

आयुर्विम्याचा समावेश संपदा व्यवस्थापन योजनांमध्ये करताना काही लाभांचा उल्लेख फार प्रकर्षाने केला जात नाही. करविषयक लाभ हे त्यापैकीच आहेत. या पॉलिसींमधील रोखतेच्या मूल्यातील वाढ ही लगेच करपात्र ठरत नाही आणि करदायीत्व कमीतकमी स्तरावर ठेवून संपत्ती जमा करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना एक प्रभावी साधन मिळते. या करविषयक लाभाच्या वैशिष्ट्यांमुळे, आयुर्विमा, आर्थिक योजनांचे अनुकूलन करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांसाठी आकर्षक पर्याय ठरत आहे.


**अक्षय धांड**, नियुक्त ॲक्चुअरी,
कॅनरा एचएसबीसी लाइफ इन्शुरन्स